महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

पी.आर-३/सबसिडी/ No 27769 दिनांक :- 5 SEP 2014

**वाणिज्य परिपत्रक क्र. २२७**

**विषय** :- राज्यातील १२३ तालुक्यांत टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात ३३ % सवलत देण्याबाबत.

**संदर्भ** :- शासन निणय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २०१/म-७ दिनांक १९/०८/२०१४.

राज्यात मान्सूनचे आगमन उशीरा होऊन पर्जन्याचे प्रमाण काही भागात कमी झाल्याने आजपर्यंत राज्यातील १२३ तालुक्यांमध्ये ५० टक्केपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याचे आढळून आले. सदर १२३ तालुक्यांमध्ये संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे शासनाने टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केलेली आहे.

सदर शासन निर्णयात ५० टक्केपेक्षा कमी पर्जन्यमान झालेल्या राज्यातील एकूण १२३ तालुक्यांतील कृषीपंपाच्या चालू वीज बिलामध्ये ३३ टक्के सवलत देण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर ३३ टक्के सवलत कृषी ग्राहकांना देण्यात येणा-या शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये देण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सदरच्या सवलतीच्या वीज दराची देयके वितरीत करण्यात यावीत.

विभागवार जिल्हा निहाय दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली असुन टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

तसेच टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांची /गावांची व कृषी ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी.

शासन आदेशाप्रमाणे सदर तालुक्यांतर्गत कृषी ग्राहकांना २०१४-१५ या वर्षातील माहे जून १४ चे चालू वीज बिलामध्ये (त्रैमासिक) ३३ टक्के इतकी सवलत देण्यात यावी. माहे जून २०१४ चे त्रैमासिक वीज बिल यापुर्वीच निर्गमित झालेले असल्यास सदर सवलत पुढील त्रैमासिक वीज बिलात समायोजित करण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सदरच्या सवलतीच्या वीज दराची देयके वितरीत करण्यात यावीत.

शासनाच्या सवलतीच्या दराने चालू वीज देयकाचा तसेच थकबाकीचा भरणा न करणा-या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा नियमानुसार / कायद्यानुसार खंडीत करण्याची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

सन २०१४-१५ या वर्षातील जून १४ च्या त्रैमासिक विज देयकामध्ये ३३ टक्के सवलत दिल्यामुळे शासनावर पडणा-या आर्थिक भाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सविनय सादर -**

१) मा. संचालक (संचलन), महावितरण, मुंबई.
३) मा. संचालक (वित्त), महावितरण, मुंबई.
४) मा. कार्यकारी संचालक (वाणिज्य), महावितरण, मुंबई.
५) मा. प्रादेशिक कार्यकारी संचालक - १/२/३, महावितरण, कल्याण/पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ (महावितरण)
२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात १२३ तालुक्यांतील टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना चालू वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरात ३३ टक्के सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्ततः करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल. तसेच शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर रक्कम कृषी ग्राहकांच्या विज देयकातुन वळती करण्यात यावी.

**प्रत रवाना :-**

सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण.

**परिशिष्ट अ-**

टंचाई परिस्थिती जाहिर करण्यात आलेले १२३ तालुके खालीलप्रमाणे.
शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१४/प्र.क्र.२०१/म-७ दिनांक-१९.०८.२०१४.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | तालुके |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | नाशिक | मालेगाव, नांदगाव, येवले, देवळा |
| | | नंदुरबार | नवापुर. |
| | | जळगांव | मुक्ताईनगर, जामनेर, बोदवड |
| | | अहमदनगर | पारनेर, कर्जत, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता. |
| २. | पुणे | पुणे | दौंड. |
| | | सोलापूर | बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, माळशिरस. |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद, पैठण, गंगापूर, खुलदाबाद, फुलंब्री. |
| | | जालना | भोकरदन, जाफ्राबाद, जालना, अंबड, परतुर, बदनापूर, घनसावंगी, मंठा. |
| | | बीड | पाटोदा, आष्टी, गेवराई, माजलगाव, केज, परळी, धारुर, शिरुर (कासार). |
| | | लातूर | औसा, अहमदपूर, उदगीर, चाकूर, जळकोट. |
| | | उस्मानाबाद | उस्मानाबाद, तुळजापूर, परांडा, भूम, कळंब, उमरागा, लोहारा. |
| | | नांदेड | नांदेड, बिलोली, मुखेड, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, मुदखेड, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर, नायगाव. |
| | | परभणी | परभणी, गंगाखेड, पाथ्री, जिंतूर, पूर्णा, पालम, सेलू, सोनपेठ, मानवत. |
| | | हिंगोली | हिंगोली, कळमनुरी, बसमत, औढा नागनाथ, सेनगाव. |
| ४ | अमरावती | बुलढाणा | चिखली, देऊळगाव राजा, मेहकर, सिंदखेड राजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा, नांदुरा. |
| | | वाशीम | रिसोड, मालेगाव, मानोरा. |
| | | यवतमाळ | यवतमाळ, कळंब, दिग्रस, आर्णी, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मोरेगांव, झरी-जामडी, केळापूर, घाटंजी, राळेगाव |
| ५ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपूर, मुल, गोंडपिंपरी, वरोरा, भद्रावती, नागभीड, राजुरा, कोरपना, बल्लारपूर, पोंभुर्णा, जिवती. |
| | | गडचिरोली | सिरोंचा. |